शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करण्यासंदर्भात
तसेच गुणात्मक बाबींचा अभ्यास करण्यासाठी
कोअर ग्रूप गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्रमांक- माशाअ-२००९/(२५१ /०९)/माशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- 03 जुलै २००९.

**शासन निर्णय :-**

दि. २७ मे २००९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करण्यासंदर्भात राज्य सल्लागार समिती गठित करण्यात आलेली आहे. दि. २५ जून २००९ रोजी राज्य सल्लागार समितीच्या प्रथम बैठकीत झालेल्या निर्णयानुसार शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करण्यासंदर्भात पुढीलप्रमाणे कोअर ग्रूप गठित करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | डॉ. श्रीमती सुमन करंदीकर, शिक्षणतज्ञ, पुणे | अध्यक्ष |
| २ | श्री. एस. पी. जवळकर, शिक्षणतज्ञ , औरंगाबाद | सदस्य |
| ३ | श्री. विलास कुलकर्णी, कार्यकारी संचालक, एज्युकेअर | सदस्य |
| ४ | डॉ. जगन्नाथ पाटील, ॲडव्हायझर,नॅक, बंगलोर | सदस्य |
| ५ | डॉ. श्रीमती शकुंतला काळे, विभागीय सचिव, पुणे | सदस्य |
| ६ | डॉ. श्रीमती सुवर्णा खरात, अवर सचिव, शा.शि. व क्री.वि. | सदस्य सचिव |

२. कोअर ग्रूपमधील सदस्यांनी कर्नाटक, तामिळनाडू व आंध्र प्रदेश या राज्यांना भेटी देऊन खालील बाबींसंदर्भातील अहवाल शासनास सादर करावा :-

- क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडिया व नॅबेट यांनी निश्चित केलेल्या मानांकनानुसार या राज्यांमध्ये कशा पध्दतीने शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करण्यात येत आहे .
- आयसीएसई/सीबीएसई शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देणे तसेच राज्य भाषा बंधनकारक करण्याबाबत अवलंबिण्यात येणारी कार्यपध्दती
- सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत लाभ घेणाऱ्या शाळांचे असेसमेंट कोणत्या पध्दतीने केले जाते.

३. सदर कोअर ग्रूपने मा.मंत्रिमहोदयांच्या सूचनांनुसार कर्नाटक , आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यातील उपरोल्लिखित बाबींचा अभ्यास करुन शासनास पंधरा दिवसात अहवाल सादर करावा. यासंदर्भात अभ्यासदौ-याकरिता येणारा खर्च महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत करण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २००९०७०३१७१५४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. सुवर्णा सि. खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
डॉ.श्री. जगन्नाथ पाटील, नॅकचे डेप्युटी अडव्हायझर
श्री. विलास कुलकर्णी, कार्यकारी संचालक, एज्युकेअर
मा. श्री. विक्रम व. काळे, विधान परिषद सदस्य
सीबीएसई/आयसीएसई/आयबी मंडळाचा प्रत्येकी एक प्रतिनिधी
श्री. एस.पी.जवळकर, औरंगाबाद- शिक्षण तज्ञ
प्रा. लिलाधर दुलिचंद्र बागडे, गोंदिया-- शिक्षण तज्ञ
डॉ. सुमन करंदीकर, पुणे- शिक्षण तज्ञ
डॉ. श्रीम. शकुंतला काळे, विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ.
श्री. अ.मा. भट्टलवार, सहसचिव(माध्यमिक), शा.शि. व क्री.वि., मंत्रालय, मुंबई
श्री. ना. उ. रौराळे, उपसचिव (प्राथमिक), शा.शि. व क्री.वि., मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषदा
सर्व शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई
मा.मंत्री (शालेय शिक्षण)यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील कार्यासन अधिकारी-प्राशि-३/उमाशि-१/अर्थसंकल्प.
निवड नस्ती माशि-१.